आपल्या हातात काहीच नसते
तेव्हा हात हेच सर्वस्व असते,
तेवढ्या पुरतेच जीवन असते.

आपल्या हातात बळ बळावते
तेव्हा हात लांब लांब होतात,
दूर दूरचे सहजपणे हाती येते.

हात जेव्हा उंच झेपावतात
आकाशाला गवसणी घालतात,
तेव्हा आकाश विनम्रतेने वाकते.

हात, हातात हात घालतात
तेव्हा जग सारे छोटे होते,
आपले जीवन मात्र विस्तारते.

२७.१.२०१९